**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २४/२०१२ मधील नि.क्र. ४४ वरील आदेश.**
**अरूण एरंडकर -विरुध्द- श्रीरंग जाधव व इतर**
**आदेश पारित दिनांक ०७.०७.२०२३**

---

अर्जदार यांनी प्रस्तूतचा अर्ज मयत जाबदेणार क्र. १ श्रीरंग बापू जाधव यांचे वारस कायदेशीर वारस म्हणून अभिलेखावर नोंद होणेकरिता दाखल केलेला आहे. सदर अर्जासहीत अर्जदार अरुण बबन एरंडकर यांचे निशाणी क्र. ४५ वर सत्यप्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केले आहे.

**०२.** प्रस्तूत अर्जामध्ये असे कथन करणेत आले आहे की, सदरचे प्रकरण चालू असताना या दाव्यातील जाबदेणार क्र. १ श्रीरंग बापू जाधव हे दिनांक ०५.०८.२०१६ रोजी मयत झाले आहेत. प्रस्तूत अर्जात नमूद केलेनुसार मयत जाबदेणार क्र. १ श्रीरंग बापू जाधव यांना वारस क्र. १ ते ७ असे एकूण सात कायदेशीर वारस आहेत. उपरोक्त नमूद वारसांची नोंद अभिलेखावर व्हावी, तसेच, प्रस्तूतची दुरुस्ती ही किरकोळ स्वरुपाची असून त्यामुळे मुळ अर्जाच्या सरनाम्यामध्ये कोणताही बदल होत नाही. करिता मयत जाबदेणार क्र. १ श्रीरंग बापू जाधव यांच्या वारसांच्या नावांची नोंद अभिलेखावर व्हावी अशी विनंती करणेत आली आहे.

**०३.** सदरकामी, जाबदार क्र. ९ व १० यांचेतर्फे हे म्हणणे दाखल केले आहे की, अर्ज खरा, प्रामाणिकपणाचा व बरोबर नाही. अर्जामधील कथने खरी नाहीत. सबब, अर्ज फेटाळण्यात यावा.

**०४.** अर्जदाराचे प्रस्तूत अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जाबदेणार क्र. १ श्रीरंग बापू जाधव हे दिनांक ०५.०८.२०१६ रोजी मयत झाले आहेत. प्रस्तूत अर्जात नमूद केलेनुसार मयत जाबदेणार क्र. १ श्रीरंग बापू जाधव यांना वारस क्र. १ ते ७ असे एकूण सात कायदेशीर वारस आहेत. सदर मुळ अर्जाचा गुणदोषावर निकाल देणेकामी जाबदेणार क्र. १ श्रीरंग बापू जाधव यांचे नावाच्या पुढे 'मयत' असे लिहून त्यांचे वारस अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. सदर मुळ अर्ज

परिणामकारकरित्या निकाली करणेसाठी मयत पक्षकारांचे सर्व कायदेशीर वारसदार हे अभिलेखावर नमूद होणे आवश्यक आहे. सबब, पुढील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्जदार यांचा निशाणी क्र. ४४ चा अर्ज मंजूर करणेत येतो. |
| २. | अर्जदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेली दुरुस्ती विहीत कालावधीमध्ये करावी व त्याप्रमाणे दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करणेत यावी. |
| ३. | सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी. |

(अ. क. दामटे)
दिनांकः- ०७.०७.२०२३ दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, खंडाळा.